# संत शिरोमणी श्री रोहिदास महाराज जयंती उत्सव मोठया उत्साहात संपन्न
# आमदार प्रशांत ठाकूर यांची उत्सवाला प्रमुख उपस्थिती

पनवेल(प्रतिनिधी) तालुक्यातील सावळे येथे आयोजित करण्यात आलेल्या संत शिरोमणी श्री रोहिदास महाराज जयंती उत्सवाला लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पुन अभिवादन केले.

सावळे येथील समाजमंदिर येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा चर्मकार संघटनेचे अध्यक्ष अरविंद सावळेकर, ह.भ.प.बाळकृष्ण महाराज पाटील, ह.भ.प.तुकाराम केदारी, ह.भ.प.जोडे महाराज, पनवेल तालुका चर्मकार संघटनेचे अध्यक्ष ॲड.गजानन करावकर, खालापूर तालुका अध्यक्ष राजेंद्र जमदडे, पंचायत अध्यक्ष लक्ष्मण कल्याणकर, श्री मोहोकर, रामनाथ आंबोळकर, गणेश आंबोळकर, रायगड जिल्हा चर्मकार संघटनेचे संघटक नंदकुमार तळकर, शशिकांत मोहोकर, तुकाराम म्हात्रे, नंदकुमार गरूडे, बाबूराव कल्याणकर, देवळोली ग्रामपंचायतीचे सरपंच जयदास पाटील, माजी उपसरपंच यादव दिघे, सावळे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच एन.के.माळी, ह.भ.प.यशवंत कुरूंगळे, नितीन माळी, सुनिल माळी, सुप्रसिध्द निवेदक टि.के.माळी, गणेश आंबेतकर, खालापूर चर्मकार संघटनेचे सचिव अनिल खालापूरकर, सहसचिव रामचंद्र गायकवाड, उपाध्यक्ष नरेश भोईर, राजीव कडवे, संघटक दिलीप बोंबे, खजिनदार संजय कदम यांच्यासह श्री संत शिरोमणी रोहिदास ज्ञाती विकास मंडळाचे अध्यक्ष संदीप भोईर, सल्लागार ह.भ.प.गणेश भोईर, बळीराम भोईर, सुनिल भोईर, विशाल भोईर, प्रविण भोईर, सतिश साठे, सुभाष साठे, अर्जुन होलमुखे, संकेत चौलकर, प्रशांत म्हशीलकर यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.

या जयंती सोहळयात श्री संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, श्री महालक्ष्मी प्रासादिक भजन मंडळ व हनुमान भजन मंडळ सावळे यांचे भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, महिला प्रवचनकार अंजली माळी यांचे प्रवचन, स्वागत समारंभ, ह.भ.प.हरिभाऊ महाराज माळी यांचे सुश्राव्य किर्तन, महाप्रसाद आदी कार्यक्रमे पार पडली.